# महानगरपालिका शिक्षण विभाग,नाशिक

कार्यालय:-राजीव गांधी भवन,शरणपूर रोड, नाशिक-४२२००२
Email:-nmcschoolborad@gmail.com फ़ोननंबर :- 0253-2571289


मनपा/शिवि/वशि/सशिअ/सशिवित-०१/रोटरी क्लब/2286 /२०२४-२५ दि.०३/०७/२०२५

प्रति,

सर्व मुख्याध्यापक,
प्राथमिक व माध्यमिक शाळा, नाशिक महानगरपालिका

**विषय: विज्ञान प्रदर्शनासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्याबाबत..**
**संदर्भ:-** रोटरी क्लब नाशिक यांचे पत्र दि.२४/०६/२०२५

उपरोक्त संदर्भिय विषवान्वये, रोटरी क्लब नाशिक रोड, नाशिक यांच्या वतीने दिनांक **२७ जुलै २०२५** रोजी **Combined Primary School, देवळाली कॅम्प, नाशिक** येथे **विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन** करण्यात आले आहे. या प्रदर्शनामध्ये विद्यार्थ्यांना विज्ञानविषयक संकल्पना सादर करण्याची आणि इतरांच्या प्रकल्पांमधून शिकण्याची संधी उपलब्ध होणार आहे. हे प्रदर्शन विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाचा विकास करण्यास व त्यांच्या सृजनशीलतेला चालना देण्यासाठी उपयुक्त ठरेल.

तरी, आपल्या शाळेतील **इच्छुक व पात्र विद्यार्थ्यांना या विज्ञान प्रदर्शनात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे.** सोबतच या संदर्भातील **माहिती पत्रक** संलग्न केलेले आहे. त्याचे काळजीपूर्वक वाचून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवावे. सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे, प्रकल्पाचे विषय व इतर आवश्यक तपशील वेळेत आयोजकांकडे पाठवावेत. सदर उपक्रमातील विद्यार्थ्यांचा सहभाग ऐच्छिक स्वरूपाचा आहे, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

(डॉ.मिता चौधरी)
**प्रशासनाधिकारी**
**मनपा शिक्षण विभाग, नाशिक**

**प्रत सविनय सादर,**

1. मा.अति.आयुक्त सो. (1), नाशिक महानगरपालिका, नाशिक

**प्रत कार्यवाहीसाठी,**

सेक्रेटरी, रोटरी क्लब नाशिक रोड, नाशिक

**दिनांक** : १५-०६-२०२५

प्रति,
मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका
________________________,
________________________.

**विषय** : विज्ञान प्रदर्शन व स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी आमंत्रण.

आदरणीय महोदय / महोदया,
आपल्याला कळवताना अत्यंत आनंद होत आहे की रोटरी क्लब ऑफ नाशिक रोड, नाशिक महानगरपालिका (शिक्षण विभाग), जिल्हा परिषद (शिक्षण विभाग) आणि आर्टिलरी सेंटर नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवण्यासाठी व नवनवीन कल्पनांना प्रोत्साहन देण्यासाठी विज्ञान प्रदर्शन व स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे.

कार्यक्रम तपशील :
**दिनांक**: रविवार, २७ जुलै २०२५
**वेळ**: सकाळी १०:०० ते दुपारी २:००
**स्थळ**: कॉम्बाइन्ड प्रायमरी स्कूल ग्राउंड, गुरुद्वाऱ्याच्या समोर, देवळाली, नाशिक
**थीम**: विज्ञान आणि समाज, शाश्वत भविष्यासाठी नवनवीन कल्पना, ऊर्जा आणि शक्ती

आपल्या प्रतिष्ठित शाळेस या उपक्रमात सहभागी होण्यासाठी मनःपूर्वक आमंत्रण देण्यात येत आहे. या विज्ञान प्रदर्शन व स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना इतर शाळांतील विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याची आणि विविध वैज्ञानिक संकल्पना समजून घेण्याची संधी मिळेल.

विद्यार्थ्यांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे केले जाईल:
श्रेणी १: मराठी माध्यम – इयत्ता ६ वी व ७ वी
श्रेणी २: मराठी माध्यम – इयत्ता ८ वी व ९ वी
श्रेणी ३: इंग्रजी माध्यम – इयत्ता ६ वी व ७ वी
श्रेणी ४: इंग्रजी माध्यम – इयत्ता ८ वी व ९ वी

विद्यार्थ्यांच्या प्रकल्पांचे परीक्षण तज्ज्ञ परीक्षकांच्या पॅनलमार्फत केले जाईल.
आपल्याला विनंती करण्यात येत आहे की, आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांनी या प्रतिष्ठेच्या स्पर्धेमध्ये उत्साहाने सहभाग घ्यावा आणि आपल्या शाळेचे योग्य प्रतिनिधित्व करावे.

कृपया आपल्या शाळेचा सहभाग १५ जुलै २०२५ पर्यंत खालीलपैकी कोणत्याही संपर्कावर फोन किंवा व्हॉट्सॲपद्वारे नोंदवावा:
रोटे. महेश साळवे (९६८९८९१८१८)
रोटे. सौमित्री दास (९४२२७६३७७९)

आपल्या सकारात्मक प्रतिसादाची आणि विद्यार्थ्यांच्या उत्साही सहभागाची आम्ही आतुरतेने वाट पाहत आहोत.
विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन आणि प्रतिभा वाढवण्यासाठी आपल्याकडून मिळणाऱ्या पाठिंब्याबद्दल मनःपूर्वक आभार.

आपला विश्वासू,

रोटे. दिलीप दिघे
अध्यक्ष
रोटरी क्लब ऑफ नाशिक रोड

In Affiliation with:

Rotary **ROTARY CLUB OF NASIK ROAD**
R.I DIST. 3030 I CLUB No. 26244 I Club Chartered in 1989

NASHIK MUNICIPAL CORPORATION

# विज्ञान प्रदर्शनी व विज्ञान स्पर्धा – २७ जुलै २०२५

शाळेचे नाव : ______________________________

शिक्षकाचे नाव : ______________________________

मोबाईल क्रमांक : ______________________________

प्रकल्पाचे नाव : ______________________________

विद्यार्थ्याचे नाव (१) : ______________________________

विद्यार्थ्याचे नाव (२) : ______________________________

प्रकल्पासाठी विद्युत पॉईंट आवश्यक आहे का? होय / नाही

नोंदणी शुल्क रुपये 300/- भरण्यासाठी कृपया हा QR कोड स्कॅन करा.
भरणा झाल्यानंतरचा स्क्रीनशॉट व भरलेला फॉर्मचा फोटो व्हॉट्सअॅप क्रमांक ९६८९८९१८१८ वर शेअर करा.

भरलेला फॉर्म जमा करण्याची शेवटची तारीख : १५ जुलै २०२५
नोंदणी शुल्क: प्रत्येक गटासाठी ₹३००/- (प्रत्येक गटामध्ये २ विद्यार्थी असतील)
प्रत्येक सहभागी विद्यार्थ्यास सहभाग प्रमाणपत्र व अल्पोपहार (नाश्ता व पाणी) दिले जाईल.

**स्पर्धेच्या ४ श्रेण्या असतील**:
श्रेणी १: मराठी माध्यम – इयत्ता ६ वी व ७ वी
श्रेणी २: मराठी माध्यम – इयत्ता ८ वी व ९ वी
श्रेणी ३: इंग्रजी माध्यम – इयत्ता ६ वी व ७ वी
श्रेणी ४: इंग्रजी माध्यम – इयत्ता ८ वी व ९ वी

प्रत्येक श्रेणीत विजेत्यांना पुढीलप्रमाणे पारितोषिक दिले जाईल:
**प्रथम क्रमांक:** ₹५,०००/- रोख रक्कम + विजेता ट्रॉफी
**द्वितीय क्रमांक**: उपविजेता ट्रॉफी
**तृतीय क्रमांक**: तिसऱ्या क्रमांकाची ट्रॉफी

- विद्यार्थ्यांना प्रदर्शन स्थळी घेऊन येणे व सुरक्षितरीत्या परत नेण्याची जबाबदारी संबंधित शाळा व शिक्षकाची असेल.
- कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी शिक्षक प्रकल्पाच्या योग्य मांडणीस व सादरीकरणास मदत करू शकतात, परंतु शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या वतीने प्रकल्प सादर करणे अथवा प्रश्नांची उत्तरे देणे मान्य नाही.
- प्रदर्शनादरम्यान कोणत्याही वैज्ञानिक प्रयोगामुळे निर्माण होणाऱ्या अपघात किंवा परिणामांबाबत रोटरी क्लब ऑफ नाशिक रोड जबाबदार राहणार नाही.
- सर्व हक्क रोटरी क्लब ऑफ नाशिक रोड यांच्याकडे राखीव आहेत.

अधिक माहितीसाठी किंवा शंका असल्यास कृपया प्रकल्प प्रमुखांशी संपर्क साधावा:
रोटे. महेश साळवे – ९६८९८९१८१८ / रोटे. सौमित्री दास – ९४२२७६३७७९